वाचले :-१) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि.०७/०७/२०२३ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/३७७/२०२३
दिनांक - ०७/०७/२०२३

विषय – मनपाचे जिल्हा परिषदेकडील शैक्षणिक कामकाजाकरीता समन्वय साधणेकामी श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग,सहाय्यक शिक्षक यांची नियुक्ती करणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक शिक्षण विभाग कार्यरत आहे. माध्यमिक शिक्षण विभागा अंतर्गत १८ माध्यमिक विद्यालये व ०९ भागशाळा तसेच ऊर्दू माध्यमाचे ०७ विद्यालये कार्यरत आहेत.त्यामुळे माध्यमिक विद्यालयाचे एकूण २४ विद्यालये व ०९ भागशाळा आहेत.तसेच चालू वर्षी नव्याने चालू झालेली माध्यमिक विद्यालय,कासारवाडी येथे ऊर्दू माध्यमाचा इयत्ता ९ वी चा वर्ग चालू करणेत आलेला आहे.माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षकांचे रोष्टर व संच मान्यता कामकाज करणे, तसेच विद्यालयांची सर्व प्रकारच्या शिष्यवृत्या,एस.एस.सी.बोर्डाकडील कामकाजाचे नियोजन करणे व वेळेत प्रक्रीया पुर्ण करणे संचमान्यता जिल्हापरिषदेकडून विहीत मुदतीत मंजुरी करून घेणे इत्यादी कामकाज करण्यात येते. सदरचे कामकाज हे शैक्षणिक दृष्ट्या असुन विहीत वेळेत कालमर्यादीतील कामकाज आहे. त्याकरीता माध्यमिक शिक्षण विभागातील अपुरी कर्मचारी संख्या विचारात घेउन माहितीगार शिक्षकांची सदर कामकाजाकरीता नियुक्ती करणे आवश्यक आहे. श्री.अदिनाथ शहादेव कराड,सहाय्यक शिक्षक फुगेवाडी भागशाळा बोपखेल व श्री.कोपनर सचिन जयसिंग,सहाय्यक शिक्षक काळभोरनगर भागशाळा चिखली हे सद्यस्थितीत कामकाज पहात आहेत.त्यांच्या कामाचा अनुभव विचारात घेउन त्यांची उक्त कामकाजाकरीता नियुक्ती केल्यास कामकाज विहित मुदतीत व अचुक होईल.विद्यालयाचे जिल्हा परिषदेकडील संपुर्ण कामकाजात समन्वय ठेवणे, एस.एस.सी.बोर्ड परिक्षा,विद्यार्थी गुणवत्ता शिष्यवृत्ती इत्यादी चे नियोजन करणे तसेच कार्यालयाकडील शैक्षणिक कामकाजाकरीता समन्वय ठेवणेकामी श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग, सहा.शिक्षक यांनी सद्यस्थितीतील मुळ कामकाज सांभाळून कामकाज देणे आवश्यक आहे.

सबब, वरील सर्व बाबींचा विचार करून मी सहाय्यक आयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८ या आदेशान्वये श्री.अदिनाथ शहादेव कराड,सहाय्यक शिक्षक फुगेवाडी भागशाळा बोपखेल व श्री.कोपनर सचिन जयसिंग,सहाय्यक शिक्षक काळभोरनगर भागशाळा चिखली यांना त्यांच्याकडील सद्यस्थितीतले स्वत:चे कामकाज सांभाळून समन्वयक पदाचे अतिरिक्त कामकाज सोपविणेस मान्यता देण्यात येत आहे.सदर आदेशाचे संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे. श्री.कराड आदिनाथ शहादेव व श्री.कोपनर सचिन जयसिंग ,सहाय्यक शिक्षक यांना सदरचे कामकाज दिल्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अतिरिक्त मेहनताना अदा केला जाणार नाही. तसेच कोणत्याही सेवाजेष्ठतेमध्ये लाभ दिला जाणार नाही. सदरचा आदेश कोणत्याही पदोन्नती करीता ग्राह्य धरला जाणार नाही. श्री.कराड आदिनाथ व श्री.कोपनर सचिन जयसिंग,सहाय्यक शिक्षक हे ज्या विद्यालयात कार्यरत असतील त्या विद्यालयातील मुख्याध्यापक यांची तक्रार येऊ नये,याची दक्षता घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

प्रति,

१) श्री.कराड आदिनाथ शहादेव, सहाय्यक शिक्षक

२) श्री.कोपनर सचिन जयसिंग ,सहाय्यक शिक्षक

२/-सद्यस्थितीतले कामकाज सांभाळून समन्वयक पदाचे कामकाज करणेत यावे.

प्रत,

मुख्याध्यापक,सर्व माध्यमिक विद्यालये

२/-संबंधितांना योग्य ते सहकार्य करणेत यावे.

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.